6 OCT 2017
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाची शिवपावन पदभ्रमंती मोहीम यशस्वी

## कुलगुरू डॉ. शिंदे कुटुंबासह मोहिमेत सहभागी : वाड्यावस्त्यांवरील विद्यार्थ्यांना दप्तराचे वाटप, विविध कार्यक्रमांतून इतिहासाचा जागर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव अशा घोषणांच्या गजरात शिवाजी विद्यापीठातर्फे नुकत्याच आयोजित केलेल्या शिवपावन पदभ्रमंतीचे उद्घाटन सह्याद्री प्रतिष्ठानचे चिफ पेट्रन खासदार युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. मोहिमेचा समारोप पावनखिंडीत झाला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पावनखिंड परिसरातील फरसबंदी मार्गाचे पूजन करण्यात आले. तत्पूर्वी, पांढरेपाणी ते पावनखिंड मार्गे पालखी मिरवणूक काढण्यात आली.

शिवाजी विद्यापीठ आणि सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवपावन पदभ्रमंती मोहीम' आयोजित करण्यात आली होती. मोहिमेत राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवपावन पदभ्रमंती मोहीम' यशस्वी झाल्यानंतर आनंद साजरा करताना विद्यार्थी.**

समारोपप्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. येळवण–जुगाईचे उपसरपंच सत्यवान खेतल यांच्या हस्ते डॉ. शिंदे यांचा शिवछत्रपतींची मूर्ती देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा विद्यार्थी अर्जुन मिरजकर व शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी मगदूम पांढरेपाणी परिसरात सर्वप्रथम पोचल्याने तिचा सत्कार करण्यात आला. राजनंदिनी पाटील व कैवल्य शिंदे या पाच वर्षीय चिमुरड्यांनी ही मोहीम पूर्ण केल्याबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले. नगराध्यक्ष रूपाली धडेल, शस्त्र संग्राहक गिरीश जाधव, रवी धडेल, प्रतिष्ठानचे अध्यक्ष हेमंत साळोखे उपस्थित होते. पदभ्रमंती मार्गावरील वाड्या–वस्त्यांतील मुलांना कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते दप्तरांचे वाटप झाले. करपेवाडी मुक्कामी शाहीर रंगराव पाटील यांनी शाहिरी सादर करत विद्यार्थ्यांची मने जिंकली. इतिहास अभ्यासक राम यादव यांनी पन्हाळा ते पावन परिसर घडलेल्या इतिहासाची माहिती दिली, तर अभिलेखापाल गणेशकुमार खोडके यांनी 'शिवरायांची पत्रे' या विषयी माहिती दिली. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या पत्नी अनिता, मुलगा शंतनू व मुलगी कैरवी, आई नागरबाई मोहिमेत सहभागी झाल्या होत्या. यावेळी बीसीयुडीचे माजी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सुहास पाटील, डॉ. संगीता पाटील प्रदीप थोरवत उपस्थित होते.

६ OCT 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत जैवसंवर्धन समुदायाला ठरतील लाभदायक

## डॉ. विलास बर्डेकर : शिवाजी विद्यापीठात जैवविविधता संवर्धनवर कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ५ : "जैवसंवर्धनासाठी शाश्वत प्रयत्न करीत राहिल्यास अंतिमतः ते मानवी समुदायासाठी लाभदायक ठरेल",असे प्रतिपादन राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष डॉ. विलास बर्डेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभाग, राज्य जैवविविधता मंडळ, वन विभाग नागपूरतर्फे राज्यस्तरीय जैवविविधता संवर्धन आणि जागृती यावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. डॉ. बर्डेकर म्हणाले, "आपण सणांच्या नावाखाली पर्यावरण, झाडांचा जो नाश करतो,तो टाळण्यासाठी लोकजागृती करणे आवश्यक आहे. जडीबुटी विकणाऱ्या लोकांकडील ज्ञानही जतन करणे आवश्यक आहे. आपल्याकडील ज्ञान, संशोधनाचे इतर देशांत खूप मोठ्या प्रमाणात संवर्धन होते.आपल्या देशात मात्र तसे होत नाही. त्या दृष्टीनेही आपण सदैव जागरूक राहणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा जैवविविधतेचा वारसा जोपासणारा आहे. या परिसरात विविध प्रकारची फुलपाखरे स्वच्छंदपणे विहार करताना आढळली. त्यामुळे हा परिसर खऱ्या अथनि बटरफ्लाय पार्क आहे."

डॉ. शिर्के म्हणाले, "



कोल्हापूर : प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. विलास बर्डेकर. शेजारी डॉ. एम. व्ही. शांताकुमार, डॉ. पी. डी. राऊत, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ए. डी. जाधव.

जैवविविधता ही शिवाजी विद्यापीठ परिसराची श्रीमंती आहे.संशोधक, प्राध्यापक यांच्याबरोबरच शाळेमधील विद्यार्थ्यांनाही जैवविविधतेच्या संवर्धनाची माहिती देण्याची आवश्यकता आहे. पीपल्स् बायोडायव्हर्सिटी रजिस्टर (पीबीआर) मध्ये कर्नाटक, गुजरात, केरळ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नोंदी झालेल्या आहेत. परंतु, महाराष्ट्रामध्ये याचे अत्यल्प म्हणजे अगदी दोन अंकी प्रमाण आहे."

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. डी. जाधव यांनी परिचय करून दिला. डॉ. एम. व्ही. शांताकुमार यांनी आभार मानले. डॉ. डी. व्ही. मुळेसंशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

सायंकाळी श्री. बर्डेकर, कोल्हापूरचे उप-वनसंरक्षक डॉ. प्रभुनाथ शुक्ला आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप समारंभ झाला. यावेळी रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या यळगूड येथील शेतकरी आप्पासो झुंजार, विश्वास खोत यांचा सत्कार झाला. त्याचप्रमाणे पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 OCT 2017
तरुण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए अधिविभागातर्फे अवयवदान जागृती कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. जयप्रकाश रामानंद. व्यासपीठावर डॉ. ए. एम. गुरव, डॉ. मोहन राऊत, डॉ. एच. एम. ठकार.

# अवयवदान जागृतीमध्ये तरुणांचा सहभाग आवश्यक

## अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

तरुणांमध्ये अवयवदानासंबंधी जागृती होणे गरजेचे आहे. सध्या भारतामध्ये अवयवांची गरज असणाऱ्या लोकांची संख्या फार मोठी आहे आणि दान करणारे लोक कमी आहेत. त्यामुळे समाजप्रबोधनासाठी अवयवदान जागृतीमध्ये तरुणांचा सहभाग वाढण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राजर्षी छत्रापती शाहू महाराज शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील एम.बी.ए अधिविभागातर्फे आयोजित अवयवदान जागृती कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव अध्यक्षस्थानी होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मोहन राऊत यांनी विद्यार्थ्यांना अवयवदान म्हणजे नेमके काय? अवयवदान व देहदान यातील फरक, अवयवदाना संदर्भातली समज, गैरसमज याची माहिती दिली.

एम.बी.एच्या विद्यार्थ्यांनी अवयवदान जागृती विषयक पथनाट्य सादर केले. भित्तिचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठामधील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

6 OCT 2017

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ मंडळांच्या निवडणुकांसाठी कलर कोडिंग

## १७ नोव्हेंबरला मतदान : २०ला मतमोजणी, दुरूस्तीसाठी १३२ अर्ज दाखल

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकांसाठीची नावनोंदणी पूर्ण झाली आहे. दुरूस्तीसाठी १३२ अर्ज दाखल झाले आहेत. एका जागेसाठी एकपेक्षा जास्त अर्ज आले तर उमेदवाराची ओळख पटण्यासाठी कलर कोडींग करण्यात येणार आहे. कोणत्या उमेदवाराला कोणता कलर याचा निर्णय शुक्रवारी होणाऱ्या बैठकीत घेण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका सुरळीत पार पडण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने पूर्ण तयारी केली आहे. तर नियोजित मतदान केंद्रालाही शुक्रवार ६ रोजी घेण्यात येणाऱ्या बैठकीत दिल्या जाणार आहेत. मतदान सुरळीत होण्यासाठी इतर खाजगी संस्था, कारखाने व जिल्हा प्रशासनातर्फे मतदार पेट्या व इतर आवश्यक मदत घेतली जाणार आहे. विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकांसाठी पदवीधर मतदारांचे १४ हजार ४०० तर शिक्षक, प्राचार्य, संस्थाप्रतिनिधींचे ३ हजार



अर्ज आले आहेत. मतदारांची संख्या कमी असल्याने विद्यापीठ प्रशासनावर फारसा ताण पडणार नाही. तसेच मतदान सुरळीत पार पडण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असल्याचेही डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले. परिक्षेत्रातील सर्वच संघटना आपआपल्या संघटनेची मजबूत बांधणी करण्यात गुंतल्या आहेत. इच्छुक उमेदवार संघटना पदाधिकाऱ्यांच्या संपर्कात आहेत. सोशल मिडीयाच्या माध्यमातूनही प्रचार सुरू आहे. विविध विद्याशाखांच्या १८८ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. ३० ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत आहे. ३१ ऑक्टोबर नंतरच चित्र स्पष्ट होईल. शिक्षक संघटना, संस्थाचालक, प्राचार्य असोशिएशन, सेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परीषद यांची विद्यापीठ विकास आघाडी आहे. सुटा, आजी–माजी विद्यार्थी संघटना सध्या उमेदवारांची चाचपणी करीत आहेत. दिवाळीनंतरच हालचालीला वेग येणार आहे. विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी १७ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाने निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. मतदान केंद्राची यादी व निवडणुकीबाबतची माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे..

### निवडणूक कार्यक्रम

- दुरूस्त्या केल्यानंतरची अंतिम मतदार यादी – १२ ऑक्टोबर
- निवडणूक नोटीस तारीख – २२ ऑक्टोबर
- उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख – २२ ते ३१ ऑक्टो. सायं. ५ पर्यंत.
- उमेदवारी अर्ज छाननी –२ नोव्हें.
- उमेदवारी अर्ज माघार– ४ नोव्हें. सायं. ५ पर्यंत.
- पात्र उमेदवारांची यादी – ६ नोव्हें.
- मतदान – १७ नोव्हें. सकाळी ९ ते सायं. ५पर्यंत.
- मतमोजणी व निकाल – २० नोव्हेंबर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 OCT 2017
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा प्रक्रियेत एसएमएसचा वापर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे ऑक्टोबरमध्ये घेण्यात येणाऱ्या पदवीच्या ५६८ पैकी ३० विषयांच्या परीक्षेला बुधवारपासून सुरुवात झाली. या परीक्षेला विद्यापीठ परिक्षेत्रातून ३ हजार ८४७ विद्यार्थी बसले. या परीक्षेला २५६ विद्यार्थी गैरहजर होते. तिन्ही क्षेत्रातील गैरहजर विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती घेऊन त्यांना एसएमएस पाठवून खात्री करून घेण्यात आली. एसएमएसचा नवीन प्रयोग राबवल्यामुळे एकूणच परीक्षा प्रक्रियेतील गोंधळ थांबवण्यास मदत होणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापण मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

ऑक्टोबर २०१७ मधील बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. भाग एक, दोन, तीन, बीसीए, बीबीए, बीसीए, बीए. बी. एड., बीएस. डब्ल्यू एम. ए., एमबीए, एम. कॉम., एमसीए, एल. एल. एम., बी. टेक., एम. ई., अशा विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा ५६८ या हिवाळी सत्रामध्ये होणार आहेत. कार्यक्षेत्रातील ६८ महाविद्यालयामध्ये बी. एस्सी. अभ्यासक्रमांच्या, ३६ महाविद्यालयात बी. ए. अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. डिसेंबर अखेरपर्यंत या परीक्षा पूर्ण होणार आहेत. दरम्यान दिवाळीमुळे १५ ते २२ आठ दिवस आणि १८ नोव्हेंबरला विद्यापीठाचा वर्धापनदिन असल्याने या दिवशी कोणतीही परीक्षा घेण्यात येणार नाही. यंदा परीक्षेच्या कामकाजात जास्तीत जास्त एसआरपीडी (सिक्युअर्ड रिमोट पेपर डिस्ट्रीब्युशन) कार्यान्वित केली आहे. बुधवारी सेमिस्टर ६ च्या प्रश्नपत्रिका एसआरपीडीच्या माध्यमातून पाठवण्यात आल्या असून हा प्रयोग यशस्वी झाला आहे. गैरहजर विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरण्याच्या सुचना ज्युनिअर सुपरवायझरला दिल्या होत्या. या नवीन प्रक्रियेला चांगला प्रतिसादही मिळाला आहे. या एसएमएसमुळे परीक्षा प्रक्रियेतील गोंधळ कमी होण्यास मदत होणार आहे. शिवाजी विद्यापीठाने हा प्रयोग महाराष्ट्रात पहिल्यांदाच राबवल्याचेही काकडे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 OCT 2017
लोकमत

# डी. आर. मोरे यांचा रविवारी सत्कार

## 'प्रेरणा' गौरव अंकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त रविवारी (दि. ८) दुपारी चार वाजता विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार केला जाणार आहे, अशी माहिती श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. एकनाथ काटकर यांनी मंगळवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

प्रा. काटकर म्हणाले, डॉ. मोरे यांच्या कार्याचा यथोचित सन्मान व्हावा म्हणून हा सेवागौरव कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याचे संयोजन प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे सेवागौरव समिती आणि शहाजी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी केले आहे. दसरा चौकातील यशवंतराव चव्हाण सभागृहात रविवारी होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाहू छत्रपती असतील. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते 'प्रेरणा' गौरव अंकांचे प्रकाशन होईल. पत्रकार परिषदेस डॉ. पी. आर. शेवाळे, यशवंत भालकर, राजेखान शानेदिवाण, बाबासाहेब पाटील, आप्पासाहेब वाझे, पंडितराव बोंद्रे, अरुण चोपदार, मदन बोडके, एस. पी. चौगुले, पांडुरंग पाटील, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 OCT 2017
लोकमत

# महर्षी वाल्मीकी यांना अभिवादन

कोल्हापूर : महर्षी वाल्मीकी यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठामध्ये गुरुवारी त्यांना अभिवादन केले. विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. एन. डी. पारेकर, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, उमेश भोसले, शरद पाटील, धीरज शिंदे, एम. एल. सोनटक्के, आदी उपस्थित होते.